


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३६० वा बुधवार दि ०६ मे २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# विजयच्या ब्लॉकबस्टर एन्ट्रीला काँग्रेसकडून बूस्टर; शपथविधीचा मुहूर्त ठरला, पण सस्पेन्स कायम



**वृत्तसंस्था/ चेन्नई**

तमिळनाडू विधानसभा निवडणूक निकालात पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरलेल्या थलपती विजयच्या टीव्हीके पक्षाला काँग्रेसनं पाठिंबा दिला आहे. पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरलेल्या, पण बहुमतापासून दूर राहिलेल्या टीव्हीकेला काँग्रेसनं पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे टीव्हीकेचं संख्याबळ आता ११३ वर पोहोचलं आहे. तमिळनाडूत विधानसभेच्या एकूण २३४ जागा आहेत. सत्ता स्थापनेसाठी ११८ आमदारांचा पाठिंबा गरजेचा आहे. काँग्रेसनं टीव्हीकेला पाठिंबा दिलेला आहे. पण काँग्रेस सत्तेत सामील होणार की नाही याबद्दल सस्पेन्स कायम आहे. टीव्हीकेच्या विजयानंतर अभिनेते विजय यांच्या वडिलांनी काँग्रेसकडे पाठिंबा मागितला होता. काँग्रेसनं टीव्हीके सोबत यायला हवं, असं विजय यांचे वडील म्हणाले होते. त्यानंतर दोनच दिवसांनी काँग्रेसनं टीव्हीकेला पाठिंबा जाहीर केला आहे. दिल्लीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत टीव्हीकेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला. अभिनेते विजय यांनी स्वत: काँग्रेसकडे पाठिंबा मागितला होता, अशी चर्चा आहे. राज्यात धर्मनिरपेक्ष सरकार असावं यासाठी काँग्रेसनं टीव्हीकेच्या नेतृत्त्वातील सरकारला पाठिंबा दिला आहे दिल्लीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत टीव्हीकेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला. अभिनेते विजय यांनी स्वत: काँग्रेसकडे पाठिंबा मागितला होता, अशी चर्चा आहे. राज्यात धर्मनिरपेक्ष सरकार असावं यासाठी काँग्रेसनं टीव्हीकेच्या नेतृत्त्वातील सरकारला पाठिंबा दिला आहे. टीव्हीके १०८ आमदारांसह तमिळनाडूतील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. पण बहुमतासाठी त्यांना १० आणखी १० आमदारांचा पाठिंबा गरजेचा आहे. काँग्रेसकडे ५ आमदार आहेत. त्यामुळे टीव्हीके पक्ष बहुमताच्या जवळ पोहोचला आहे. या बदल्यात काँग्रेस टीव्हीके कॅबिनेटमध्ये २ मंत्रिपदांची मागणी करु शकते. काँग्रेसनं द्रमुक सोबत आघाडी करत विधानसभा निवडणूक लढवली होती. तामिळनाडूच्या विद्यमान विधानसभेचा कार्यकाळ १० मेपर्यंत आहे. त्यामुळे त्याआधी नवीन सरकार स्थापन होणं गरजेचं आहे. काँग्रेसच्या पाठिंब्यानंतर टीव्हीकेचं संख्याबळ ११३ वर पोहोचलं आहे. राज्यातील बिगरद्रमुक आणि बिगरअण्णाद्रमुक पक्षांना ११ जागा मिळाल्या आहेत. अशा स्थितीत पीएमके आणि एमएमके सारखे लहान पक्ष टीव्हीके सोबत जाऊ शकतात. याशिवाय सीपीआय आणि आययूएमएलकडे दोन-दोन आमदार आहेत. विजय यांचा शपथविधी सोहळा चेन्नईच्या नेहरु स्टेडियमवर संपन्न होईल. या सोहळ्याला राहुल गांधी उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

# अख्खा गाय पट्टा भगवा करण्याची तयारी; बंगाल विजयानंतर भाजपकडून ऑपरेशन लोटसच्या हालचाली?

**वृत्तसंस्था/ पश्चिम बंगाल**

भाजपनं पश्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक यश मिळवताना शेजारील आसामध्ये सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवली. झारखंडमध्ये सत्तेत असलेल्या झारखंड मुक्ती मोर्चा नं आसाममध्ये पहिल्यांदाच नशीब आजमावलं. पक्षानं १६ जागा लढवल्या. पण एकाही जागेवर यश मिळालं नाही. पण २ जागांवर पक्ष दुसऱ्या क्रमांकावर राहिला. ७ जागांवर पक्षाच्या उमेदवारांनी १५ हजारांपेक्षा अधिक मतं घेतली. यावरुन भाजपच्या बड्या नेत्यानं भाष्य करताना काँग्रेसला डिवचलं. आसाममध्ये झारखंड मुक्ती मोर्चानं काँग्रेसची लंका जाळली असं म्हणत झारखंड संदर्भातही धमकी दिली. त्यावर आता झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेसनं तिखट प्रत्युत्तर दिलं आहे. आसाममध्ये नं १६ उमेदवार दिले होते. पक्षाला १.१६ टक्के मतं मिळाली. २ जागांवर पक्ष दुसऱ्या स्थानी राहिला. गोसाईगाव आणि माजबात मतदारसंघात पक्षानं दुसरा क्रमांक पटकावला. १४ मतदारसंघांमध्ये तिसऱ्या स्थानी राहिला. ७ जागांवर पक्षाला १५ हजारांपेक्षा अधिक मतं मिळाली. पण केवळ ३ उमेदवारांना आपली अनामत रक्कम वाचवता आली. अन्य १३ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली. झारखंड मुक्ता मोर्चाचे अध्यक्ष आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी आसामच्या मतदारांचे आभार मानले. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक लांबलचक पोस्ट लिहून मतदारांना धन्यवाद दिले. वेळ आणि संसाधनं अतिशय मर्यादित असूनही पक्ष आसाममध्ये आपलं अस्तित्त्व करण्यात दाखवण्यात यशस्वी झाल्याचा दावा त्यांनी केला. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते डॉ. अजय आलोक यांनीदेखील एक्सवर एक पोस्ट करुन दोन मुद्दे मांडले. झारखंड मुक्ती मोर्चाच्या उमेदवारांनी आसाममध्ये काँग्रेसची मतं खाल्ली. झारखंड मुक्ती मोर्चामुळे काँग्रेसला नुकसान झालं. झारखंड मुक्ती मोर्चानं काँग्रेसची लंका पेटवली, असा दावा आलोक यांनी केला. झारखंड सरकारमध्ये झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेस यांचा समावेश आहे. भाजप प्रवक्ते अजय आलोक यांनी त्यांच्या पोस्टमध्ये उपस्थित केलेला दुसरा मुद्दा अधिक महत्त्वाचा आहे. गंगोत्री ते गंगासागर यांच्यामध्ये झारखंड एखाद्या धरणासारखा आहे. हे धरण लवकरच फुटेल, असं सूचक विधान आलोक यांनी केलं. त्यानंतर झारखंडमधील सोरेन सरकार लवकरच कोसळेल, अशी चर्चा सुरु झाली. ऑपरेशन लोटसच्या चर्चेनं राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. सध्याच्या घडीला उत्तरेतील सगळ्याच राज्यांमध्ये भाजपची सत्ता आहे. गाय पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात एकट्या झारखंडचा अपवाद वगळता अन्य सगळ्याच राज्यांमध्ये भाजप सत्तेत आहे. यावरुन झारखंड मुक्ती मोर्चाच्या महासचिव सुप्रिया भट्टाचार्य यांनी जोरदार पलटवार केला.

# ... भाजपचा खेला; दक्षिण विजय...

## संपादकीय लेख

पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या ङ्ग तृणमूल काँग्रेस मचा गड उद्ध्वस्त करण्यात भारतीय जनता पक्षाला अखेर आलेले मोठे यश आणि तमिळनाडूत पहिल्यांदाच रिंगणात उतरलेला अभिनेता विजय याने द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक) आणि अण्णा द्रमुक या द्रविडी पक्षांच्या राजकारणाचा आजवरचा ङ्गपॅटर्नफ बदलून सत्तेपर्यंत मारलेली मजल... या आहेत पाच राज्यांतील निकालातून पुढे आलेल्या दोन ठळक घटना. आसाममध्ये भाजपची विजयाची हॅट्ट्रिक, पुदुच्चेरीत युतीद्वारे राखलेली सत्ता आणि केरळमध्ये डाव्या आघाडीचा पराभव करून काँग्रेसप्रणित आघाडीने मिळवलेला विजय हे निकालही तितकेच महत्त्वाचे; परंतु पश्चिम बंगाल आणि तमिळनाडू या राज्यांत ऐतिहासिक सत्तांतर होत असल्याने हे विजय झाकोळले गेले. बंगालमधील ममतांचा पराभव आणि देशाच्या दक्षिण ध्रुवावर झालेला दलपती विजय नामक नव्या ङ्गजननायकाफ्च्या उदय राष्ट्रीय राजकारणावर नक्कीच परिणाम करणारा आहे. कधी काळी डाव्यांचा गड मानला जाणाऱ्या पश्चिम बंगालच्या गडावर भगवा फडकावून भाजपने दीर्घ काळापासूनचे स्वप्न साकारले; तर केरळमधील पराभवाने उरलीसुरली राजवट गमावल्याने डाव्या पक्षांच्या लाल बावट्याचे देशातील सत्तेच्या राजकारणातून उच्चाटन झाले आहे. एकंदरीत, आसाम आणि पुदुच्चेरीचा अपवाद वगळता बदलाच्या प्रतीक्षेतील मतदारांनी प्रस्थापितांचा पालापाचोळा केला. पश्चिम बंगालच्या निकालांविषयी सर्वाधिक उत्सुकता होती. डाव्या पक्षांची राजवट उलथवून सत्तेवर आलेल्या ममता बॅनर्जी यांनी तीन वेळा आपला बालेकिल्ला शाबूत ठेवला. मात्र, बलाढ्य भाजप आणि केंद्रीय यंत्रणांनी चहूबाजूंनी कोंडी करून या वाघिणीची शिकार केली. राजकीय आघाडीवर आक्रमकपणे लढणाऱ्या ममतांना प्रशासनाचा गाडा हाकण्यात आलेले अपयश, हे त्यांच्या पराभवाचे मोठे कारण. पंधरा वर्षांच्या राजवटीनंतर जनतेमध्ये अत्यंत प्रबळ प्रस्थापितविरोधी भावना होती. त्यांच्या काळात औद्योगिकरण आणि आर्थिक विकास या आघाड्यांवर राज्याच्या पीछेहाटीमुळे तरुणांमध्ये नाराजी होतीच; त्यात शिक्षक भरतीसारख्या घोटाळ्यांचे आरोप आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांची भर पडली. मतदारयादीच्या सखोल पडताळणीमध्ये (एसआयआर) वगळण्यात आलेली तब्बल ९० लाख नावे, ममतांच्या सल्लागारांवरील छापे आणि केंद्रीय सुरक्षा यंत्रणांचा बंदोबस्त यांचाही परिणाम नाकारता येणार नाही. दुसरीकडे भाजपने घुसखोरी आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांवर आक्रमक प्रचार केला. स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रचारात ङ्गझालमुडीफ्ला वलय मिळवून दिले. तमिळनाडूमध्येही निर्माण झालेली प्रस्थापितविरोधी जनमताची लाट सुपरस्टार विजय याच्या ङ्गतमिळगा वेत्री कळघमम (टीव्हीके) पक्षाने आपल्या शिडात भरून घेतली. त्याच्या रूपाने एम. जी. रामचंद्रन आणि जयललिता यांच्यानंतर राज्याला वलयांकित नेतृत्व लाभेल. घराणेशाही आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे नाराजीचा फटका बसून खुद्द मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचाहीही पराभव झाला. विरोधी अण्णा द्रमुकला मतविभागणीचा फायदा करून घेता आला नाही. आणि ङ्गटीव्हीकेफ्च्या झंझावातामध्ये पारंपरिक द्रविडी राजकारणाची समीकरणे उद्ध्वस्त झाली. हिमंत बिश्व शर्मा यांच्या नेतृत्वाखाली भाजपने आसामची सत्ता राखली. स्थानिक नेतृत्व आणि पक्षसंघटनेच्या अभावाचा काँग्रेसला पुन्हा फटका बसला. मात्र, डाव्या आघाडीला खाली खेचून काँग्रेसने केरळमध्ये सत्ता मिळवली. मतदान होईपर्यंत गटबाजी रोखण्यात काँग्रेसने यश मिळवले; आता मात्र मुख्यमंत्रिपदासाठी पुन्हा चुरस निर्माण झाली असून, रमेश चेन्नितला, व्ही. डी. सतीशन आणि के. सी. वेणुगोपाल स्पर्धेत दिसतात.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पश्चिम बंगालमध्ये भाजपचा ऐतिहासिक विजय; तृणमूल काँग्रेसला सत्तेतून खाली खेचले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू, केरळ, पुदुचेरी या एकूण पाच राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या आसाममध्ये पुन्हा एकदा विजय संपादन केला आहे. सोबतच पश्चिम बंगालमध्येही भाजपने निवडणूक जिंकली आहे. येथे भाजपने तृणमूल काँग्रेसला सत्तेतून खाली खेचले आहे. दरम्यान, 4 मे रोजी या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील भाजप मुख्यालयातून भाजपच्या कार्यकर्त्यांना संबोधित केले. यावेळी त्यांनी सर्व भाजप कार्यकर्त्यांचे, निवडणूक आयोगाचे आभार मानले. आम्ही आता पश्चिम बंगाल, आसाम, पुदुचेरी या ठिकाणी विकासासाठी कटिबद्ध राहू, असे आश्वासन दिले. पश्चिम बंगाल, आसाम आणि पुदुचेरीमध्ये सरकार स्थापन झाल्यावर ते म्हणाले, गंगोत्रीपासून गंगासागरपर्यंत सर्वत्र कमळ उमलले आहे.



नवी दिल्लीतील भाजप मुख्यालयात झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी 'भारत माता की जय'च्या घोषणेसह आपल्या भाषणाची सुरुवात करत हा दिवस ऐतिहासिक आणि अभूतपूर्व असल्याचे म्हटले. पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये पक्षाला मिळालेल्या मोठ्या यशाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, आज देशातील २० हून अधिक राज्यांत एनडीए-भाजप सरकार कार्यरत आहे आणि नागरिकांच्या सेवेमुळेच जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. "जिथे भाजप, तिथे सुशासन." हरियाणा, महाराष्ट्र, दिल्ली आणि बिहारमधील विजयासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील यशाचाही त्यांनी उल्लेख केला. पंतप्रधानांनी यावेळी पुद्दुचेरीतील जनतेचे आभार मानत तेथील विकासासाठी एनडीए सरकार कटिबद्ध असल्याचे म्हटले. आसाममध्ये तिसऱ्यांदा भाजपवर जनतेने दाखवलेल्या विश्वासाला ऐतिहासिक घटना संबोधत राज्याच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

### मोदींकडून कार्यकर्त्यांच्या 'संघर्षाला' सलाम!


पश्चिम बंगालमधील भाजपचा हा विक्रमी विजय अनेक पिढ्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांच्या कष्ट आणि संघर्षामुळेच शक्य झाला आहे. मी त्या सर्वांना सलाम करतो. अनेक वर्षांपासून त्यांनी मेहनत घेतली, सर्व प्रकारच्या संकटांवर मात केली आणि आपल्या विकासकामांचा अजेंडा लोकांपर्यंत पोहोचवला. तेच आमच्या पक्षाची खरी ताकद आहेत, अशा शब्दांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगाल निकालावर प्रतिक्रिया दिली आहे.

## बारामतीत सुनेत्रा पवारांचा ऐतिहासिक विजय

**पुणे/वृत्तसंस्था**

बारामती आणि राहुरी या दोन महत्त्वाच्या मतदारसंघांतील पोटनिवडणुकांचे निकाल 4 मे रोजी जाहीर झाले आहेत. बारामतीमध्ये दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार मैदानात उतरल्या होत्या. सुनेत्रा पवार २ लाख १८ हजार ९३० मतांनी विजयी झाल्या आहेत. यासोबतच सुनेत्रा पवार यांनी देशाच्या इतिहासातील नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

राहुरी मतदारसंघातही एकतर्फी लढत पाहायला मिळाली. आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे झालेल्या पोटनिवडणुकीत भारतीय जनता पक्षाने अक्षय कर्डिले यांना उमेदवारी दिली आहे. अक्षय कर्डिले यांनी १ लाख ३९ हजार २१२ मते मिळवत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांचा पराभव केला आहे. बारामती पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अभूतपूर्व कामगिरी करत मोठा विजय मिळवला आहे. मतमोजणीच्या 24



व्या फेरीअखेर त्यांनी तब्बल 2 लाख 18 हजार 930 मतांची आघाडी घेतली, जी देशातील सर्वाधिक मताधिक्यांपैकी एक मानली जात आहे. प्रत्येक फेरीत त्यांची आघाडी वाढत गेल्याने प्रतिस्पर्ध्यांना मोठा धक्का बसला. या विजयामुळे उत्तर प्रदेशातील साहिबाबाद मतदारसंघातील आमदार सुनील कुमार शर्मा यांनी 2022 मध्ये केलेला 2 लाख 14 हजार 835 मताधिक्याचा विक्रम मागे पडल्याचा दावा केला जात आहे. बारामतीतील निकालाने हा आकडा ओलांडत नवा विक्रम प्रस्थापित केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. या निकालानंतर बारामती परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून समर्थकांनी जल्लोष साजरा केला. विजय मिळाल्यानंतर जय पवार आणि कार्यकर्त्यांनी अजित पवार यांच्या स्मृतीस्थळाला भेट देऊन अभिवादन केले. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत देशाच्या इतिहासातील सर्वात मोठे मताधिक्य मिळवून विजय संपादन केल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी सोशल मीडिया पोस्ट करत आपल्या भावना व्यक्त केल्या. सुनेत्रा म्हणाल्या, अजितदादांच्या पश्चात झालेली बारामतीची ही पहिलीच निवडणूक होती. त्यांच्या मार्गदर्शनाची आणि त्यांच्या उपस्थितीची उणीव आज प्रकर्षाने जाणवते; हा विजय माझ्यासाठी केवळ राजकीय यश नसून, आदरणीय दादांच्या कार्याला आणि त्यांच्या स्मृतींना दिलेली खरी आदरांजली आहे.

## निकाल लागताच पश्चिम बंगाल पेटले

### टीएमसी आणि भाजपचे कार्यकर्ते भिडले

**कोलकाता/वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालच्या निवडणुकीत भाजपने मोठी मुसंडी मारत विजयाचा झेंडा फडकवला आहे. मात्र, या विजयाच्या आनंदापेक्षा राज्याच्या विविध भागांतून येणाऱ्या हिंसाचाराच्या घटनांनी संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. मतमोजणी केंद्रांपासून ते राजकीय पक्षांच्या कार्यालयांपर्यंत अनेक ठिकाणी भाजप आणि तृणमूल काँग्रेसचे (टीएमसी) कार्यकर्ते एकमेकांशी भिडल्याचे चित्र समोर आले आहे. अनेक ठिकाणी परिस्थिती हाताबाहेर गेली आहे.

बैरकपूर येथील मतमोजणी केंद्राबाहेर सोमवारी मोठा राडा झाला. भाजप कार्यकर्त्यांवर हिंसाचार केल्याचा आरोप टीएमसीकडून करण्यात आला आहे. विजयी जल्लोष करताना भाजप कार्यकर्त्यांनी आणि टीएमसीच्या समर्थकांमध्ये हमरी-तुमरी झाली त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण



झाले. परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागली.

आसनसोलमध्ये तर हिंसाचाराने भीषण रूप धारण केले आहे. येथे टीएमसीच्या कार्यालयाला आग लावल्याच्या घटना समोर आल्या आहेत. भाजप कार्यकर्त्यांनीच ही जाळपोळ केल्याचा आरोप स्थानिक टीएमसी नेत्यांनी केला आहे. केवळ आसनसोलच नाही, तर दिनहाटा आणि बांकुरा या ठिकाणीही मोठा गोंधळ पाहायला मिळाला. अनेक ठिकाणी टीएमसीच्या नेत्यांच्या घराबाहेर घोषणाबाजी करण्यात आली असून, सामान्य नागरिक दहशतीच्या छायेत आहेत.

## टेक वारीतून वेगवान रोडमॅप राबविण्यावर भर : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, वृत्तसंस्था :**

तंत्रज्ञानाचा अंतिम उद्देश हा सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ करणे आहे. सर्वसामान्य माणूस हाच आपला 'विठ्ठल' असून त्याच्या सेवेसाठीच टेक वारी आहे. केवळ तंत्रज्ञान नव्हे तर मानवी संवेदना, मानसिक आरोग्य, आत्मपरीक्षण "आर्ट ऑफ हँडलिंग क्रिटिसिझम" विषयही प्रशासनासाठी महत्त्वाचा आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या 'टेक वारी' उपक्रमाच्या माध्यमातून राज्यात नागरिक-केंद्रित प्रशासनाचा वेगवान रोडमॅप राबविला जात असून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शासन अधिक कार्यक्षम आणि सुलभ करण्यावर भर दिला जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मंत्रालयातील त्रिमुर्ती प्रांगणात सामान्य प्रशासन विभागातर्फे आयोजित 'टेक-वारी २.०' अंतर्गत 'महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, केंद्र सरकारच्या क्षमता बांधणी आयोगाच्या अध्यक्ष राधा चौहान उपस्थित




होते. मुख्यमंत्री म्हणाले की, प्रशासनात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नागरिकांचे जीवन अधिक सुलभ करण्यासाठी 'टेक वारी' हा उपक्रम आहे. 'टेक वारी' ही संकल्पना वारीच्या सातत्यपूर्ण परंपरेप्रमाणेच प्रेरणादायी आहे. जसे वारकरी कोणत्याही परिस्थितीत पंढरपूरची वारी चुकवत नाहीत, तसेच आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात सातत्याने शिकणे अत्यावश्यक आहे. तंत्रज्ञान दररोज बदलत असून, ते आपण जर स्वीकारले नाही तर व्यक्ती काळाच्या ओघात मागे पडू शकतात. अक्षरज्ञानापासून इंटरनेटपर्यंत साक्षरतेची व्याख्या विकसित झाली असून आता ती एआयपर्यंत पोहोचली आहे. 'ज्याला एआय समजते आणि वापरता येते, तोच खऱ्या अर्थाने आज साक्षर आहे' असे ते म्हणाले.

### पंढरपूर तीर्थक्षेत्राचा समग्र विकास 30 महिन्यांत पूर्ण करा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत 4150.46 कोटींच्या सर्वसमावेशक आराखड्यास मान्यता देण्यात आली. पंढरपूर हे राज्यातील सर्व धर्मियांचे श्रध्दास्थान आहे. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या भाविकास आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात. पुढील 50 वर्षाचा विचार करुन या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करण्यात येणारी विकास कामे येत्या 30 महिन्यात पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.

# "त्याला जिवंत जाळा", नसरापूर प्रकरणातील आरोपीच्या पत्नीचा संताप; मुलगा म्हणतो, "बाप म्हणून घ्यायची लाज"

**सोलापूर/वृत्तसंस्था**




वर्षभरापूर्वी अंबरनाथमध्ये एका ४ वर्षांच्या चिमुकलीवर एका नराधमाने बलात्कार केल्याची घटना घडल्यानंतर त्याचे राज्यभर पडसाद उमटले होते. या घटनेवरून सर्वच स्तरातील नागरिकांनी संताप व्यक्त केला होता. आता अशीच एक धक्कादायक घटना पुण्याजवळच्या भोर तालुक्यातल्या नसरापूरमध्ये घडली आहे. एका ६५ वर्षांच्या नराधमानं साडेतीन वर्षांच्या एका चिमुकलीवर पाशवी बलात्कार केला आणि त्यानंतर दगडाने ठेचून तिची हत्या केली. या घटनेमुळे पुण्यासह अवघ्या महाराष्ट्रात खळबळ उडाली असून आपल्या चिमुकल्यांच्या सुरक्षेसोबतच अशा नराधमांना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी पुढे येत आहे. या प्रकरणी आता या आरोपीची पत्नी व मुलाने संतप्त प्रतिक्रिया देत आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

नसरापूर बलात्कार व हत्या प्रकरणातील आरोपीच्या वृद्ध पत्नीने एबीपीशी बोलताना या घटनेवर व आपल्या पतीवर संताप व्यक्त केला आहे. गेल्या १० वर्षांपासून आपला त्याच्याशी संपर्क नसल्याचंदेखील त्यांनी नमूद केलं. "त्या बाळाची हत्या झाली त्याच ठिकाणी त्याला ठेचून तसाच मारला पाहिजे. मला त्याचं तोंडही बघायचं नाहीये. माझ्यापर्यंत कुणी त्याचा अंत्यविधी झालाय वगैरे सांगायलाही येऊ नये. गेल्या १० वर्षांपासून तो आमच्या संपर्कात नाहीये. त्याला कठोर शिक्षा व्हायला हवी", असं त्या म्हणाल्या. "फक्त फाशी नाही, ठेचला पाहिजे त्याला. जिवंत जाळला पाहिजे त्याला. तरीही माझ्या मनाची झालेली आग शांत होणार नाही. त्याचं नाव आमच्या नावाला जोडलंय त्यामुळे आम्हाला लोक जे काही बोलतील ते ऐकून घ्यावं लागेल", अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. दरम्यान, याचवेळी नराधम आरोपीच्या तरुण मुलानं वडील म्हणून घ्यायचीही लाज वाटत असल्याचं सांगत परखड भावना मांडल्या. "मला तो माझा बाप म्हणून घ्यायचीही लाज वाटतेय. त्या चिमुकलीबाबत त्यानं अमानुष कृत्य केलं आहे. त्याला कठोरात कठोर शिक्षा द्यायला हवी. त्याला त्याच ठिकाणी ठेचून मारला पाहिजे. त्या चिमुकलीला न्याय दिला पाहिजे. मला ती माझ्या भाचीसारखीच आहे. मला ११ भाचा-भाची आहेत. मला या घटनेनंतर खूप वाईट वाटलंय. त्याला मारला पाहिजे. आम्हाला यात खूप मानसिक त्रास होतोय. आपण शिवछत्रपतींच्या महाराष्ट्रात राहातो. न्यायव्यवस्थेवरचा लोकांचा विश्वास वाढला पाहिजे असं आपण केलं पाहिजे", अशा भावना मुलानं व्यक्त केल्या.

ही घटना गेल्या आठवड्यात शुक्रवारी १ मे रोजी भोर तालुक्यातल्या नसरापूर या ठिकाणी घडली. नराधम ६५ वर्षीय आरोपीने गावात या चिमुकलीचा पाठलाग करून तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर दगडाने ठेचून तिची हत्या केली. कुणाला संशय येऊ नये म्हणून तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली पुरला. मुलीच्या कुटुंबीयांनी गावकऱ्यांसोबत तिचा शोध घ्यायला सुरुवात केली तेव्हा तिचा मृतदेह सापडला. यानंतर गावात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. तातडीने पोलिसांना पाचारण करून पुढील कारवाई सुरू करण्यात आली.

## चारित्र्याच्या संशयाने थरारक शेवट; क्रूर पतीने पत्नीला कायमचे संपवले

**अमरावती/वृत्तसंस्था**




संशयाचे भूत मनावर स्वार झाले की माणूस किती क्रूर होऊ शकतो, याचा प्रत्यय चांदूर बाजार तालुक्यात आला आहे. चारित्र्यावर संशय घेऊन एका नराधम पतीने आपल्या २४ वर्षीय पत्नीचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी चांदूर बाजार पोलिसांनी आरोपी पतीला बेड्या ठोकल्या आहेत.

ही घटना ४ मे रोजी सायंकाळी ५:३५ वाजताच्या सुमारास जवळा शहापूर येथे घडली. अवघ्या काही तासांतच तपासाची चक्रे फिरवत पोलिसांनी मध्यरात्री ११:३७ वाजता याप्रकरणी गुन्हा दाखल केला आणि अवघ्या काही मिनिटांतच म्हणजे ५ मे रोजी पहाटे १२:१८ वाजता आरोपीला अटक करण्यात आली. पोलीस रिपोर्टनुसार, आरोपी ऋषिकेश ऊर्फ सनी श्रीकृष्ण आठवले (वय २६ वर्ष, रा. जवळा शहापूर) याने आपली पत्नी प्रियांशी (वय २४ वर्ष) हिच्या चारित्र्यावर संशय घेतला. याच रागातून त्याने प्रियांशीवर हल्ला चढवला. ऋषिकेशने आपल्या हातातील जड अशा स्टीलच्या कड्याने प्रियांशीच्या कपाळावर, चेहऱ्यावर आणि छातीवर प्रहार केले. इतकेच नाही तर तिला लाथाबुक्क्यांनीही बेदम मारहाण केली. या गंभीर दुखापतीमुळे प्रियांशीचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील प्रवीण पाथरे यांनी तत्काळ तक्रार नोंदवली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने फॉरेन्सिक व्हॅन पाचारण करून घटनास्थळाचा पंचनामा केला. उपविभागीय पोलीस अधिकारी शुभम कुमार आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक सागर भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली चांदूर बाजार पोलीस स्टेशनचे अधिकारी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## ४ वर्षांच्या चिमुरडीनंतर, ११ वर्षीय मुलीचा वियनभंग

**मुंबई :** पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यामधील नरसापूर येथील 4 वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार आणि तिची निर्घृण हत्या केल्याने राज्यात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी 65 वर्षीय विकृताला अटक केली आहे. ही घटना ताजी असताना पुण्यात आणखी एक संतापजनक घटना घडली आहे. 11 वर्षीय मुलीचा विनयभंग केल्याची माहिती समोर येत आहे. या प्रकरणी मोठी कारवाई करत पोलिसांनी परप्रांतीय नराधमाला अटक केली आहे. सांगायचं झालं तर, पुणे जिल्ह्यात अत्याचार आणि खुनाच्या सलग दोन घटनांमुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण असतानाच, पुन्हा एकदा अल्पवयीन मुलीवर विनयभंग झाल्याने परप्रांतीयांविरुद्ध संतापाची लाट उसळली आहे. पुणे जिल्ह्यातील चाकण जवळील बिरदवडी येथे अकरा वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग झाल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. उत्तर चाकण पोलिसांनी परप्रांतीय 32 वर्षीय आरोपी अरुण गयाप्रसाद मिश्रा याला ताब्यात घेतले आहे.

## तरुणावर भरचौकात जीवघेणा हल्ला, डोक्यात घुसलेल्या कोयत्यासह रुग्णालयात पोहचला

**मुंबई/वृत्तसंस्था**

देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईत गुन्हेगारीच्या घटनांनी पुन्हा एकदा चिंता वाढवली आहे. शहरात किरकोळ कारणांवरून होणाऱ्या हल्ल्यांच्या मालिकेत आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका तरुणावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात तरुणाच्या डोक्यात कोयता घुसला. हा तरुण डोक्यात कोयता घुसलेल्या अवस्थेत स्वतः चालत सायन महापालिका रुग्णालयात पोहोचला. या घटनेचा थरकाप उडवणारा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे.

व्हिडिओतील दृश्ये अंगावर काटा आणणारी आहेत. संबंधित तरुणाच्या डोक्यात कोयता घुसला आहे. एखादा नारळ तोडताना ज्या पद्धतीने कोयत्याचे घाव टाकले जातात तशाच पद्धतीने हा कोयता त्या तरुणाच्या डोक्यात घुसला. तसाच हा तरुण रुग्णालयात आला. गंभीर जखमी असूनही तो शांतपणे उभा आहे. इतकेच नव्हे तर मोबाईल वापरत रुग्णालयात हा तरुण फिरताना देखील दिसत आहे. जखमी अवस्थेत तो स्वतःच रुग्णालयात पोहोचल्याचे सांगितले जात आहे. या तरुणाची अवस्था पाहून रुग्णालयातील सर्वजण त्याच्याकडे पाहत राहिले. या घटनेने दोन गंभीर प्रश्न ऐरणीवर आले आहेत. शहरातील वाढती गुन्हेगारी आणि आपत्कालीन आरोग्य व्यवस्थेची तयारी. अशा गंभीर जखमी रुग्णाला तात्काळ स्ट्रेचर किंवा व्हीलचेअर उपलब्ध होणे अपेक्षित असताना प्राथमिक क्षणी तशी सुविधा न मिळाल्याचेही व्हिडिओतून जाणवते. त्यामुळे रुग्णालय प्रशासनाच्या प्रतिसादावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

दरम्यान, हा व्हिडिओ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर होताच नेटकऱ्यांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. काहींनी गुन्हेगारांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे, तर काहींनी जखमी तरुणावर तात्काळ उपचाराची चिंता व्यक्त केली आहे.

# रेप फेस्टिव्हलमुळे लोक भडकले, पीडितेने जे सांगितलं त्याने जग हादरलं

**बीड/वृत्तसंस्था**





नायजेरिया मधून एक धक्कादायक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामुळे अनेकांनी संताप व्यक्त केला आहे. हा व्हिडिओ पाहून लोकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. अहवालानुसार, रस्त्यांवर महिलांचा पाठलाग करण्यात आला आणि काही तरुणांनी त्यांच्यावर कथित लैंगिक अत्याचार केले. काहींनी तर या घटनेला रेप फेस्टिव्हल असे म्हटले आहे. ही घटना मार्च महिन्यात डेल्टा स्टेट मध्ये अलुए-डो फेस्टिव्हल दरम्यान घडली असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच हा उत्सव प्रजननाशी संबंधित असून तो ओरामुड्र समुदायाकडून साजरा केला जातो असेही समोर आले आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

या उत्सवात सार्वजनिक ठिकाणी पुरुषांनी महिलांचा पाठलाग सुरू केला त्यावेळी वातावरण भयावह बनले. काही महिलांनी आरोप केला की त्यांच्या कपडे फाडण्यात आले आणि त्यांनी जबरदस्तीने निर्वस्त्र केले गेले, त्यानंतर त्यांच्यावर सार्वजनिक ठिकाणी लैंगिक अत्याचार करण्यात आले. या घटनेवेळी अनेक लोक उपस्थित होते, मात्र त्यांनी हा प्रकार रोखण्याऐवजी उलट घोषणाबाजी केली. या घटनेत मोठ्या संख्येने पुरुषांचा सहभाग होता, तसेच काही प्रकरणांमध्ये अल्पवयीन मुलांचाही समावेश होता.

या घटनेतील पीडित महिलांमध्ये जवळच्या विद्यापीठातील काही विद्यार्थिनींचाही समावेश आहे. या घटनेनंतर काही महिलांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एका पीडित विद्यार्थिनीने सांगितले की, 'मी मोटरसायकलवरून त्या भागात पोहोचली आणि काही वेळातच माझ्यावर हल्ला झाला. गर्दीतल्या लोकांनी मला पाहताच तिला पकडा असा आवाज दिला. ते मधमाश्यांसारखे माझ्यावर तुटून पडले. माझे कपडे ओढून पूर्णपणे फाडले गेले. माझ्या शरीराला अयोग्य प्रकारे स्पर्श केला. मी मदतीसाठी जोरात ओरडत होते. शेवटी एका व्यक्तीने माझी सुटका केली. त्याने हस्तक्षेप करून गर्दीतून सुरक्षित बाहेर काढले. या घटनेदरम्यान फोनही हिसकावून घेण्यात आला.'

डेल्टा स्टेट पोलिसांनी सांगितले की, 'या प्रकरणात अनेक संशयितांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये स्थानिक समुदायातील एक नेता आणि चार तरुणांचा समावेश आहे.' महिला हक्कांसाठी काम करणाऱ्या एका संस्थेच्या पदाधिकारी रीटा आयकी यांनी म्हटले, 'जेव्हा लोक उघडपणे अशा प्रकारची कृत्ये करत आणि इतर लोक ते तमाशा म्हणून पाहतात, तेव्हा हा विषय केवळ काही व्यक्तींपुरता मर्यादित राहत नाही. यातून समाजाची मानसिकता समोर येते.'

# इंग्लंड दौऱ्यासाठी संघाची धुरा अनुष्काच्या हाती

## भारत-अ संघ इंग्लंड-अ संघाविरुद्ध तीन टी-२० सामने खेळणार..

**ग्वाल्हेर, वृत्तसंस्था :**

मध्य प्रदेशातील ग्वाल्हेरची उदयोन्मुख क्रिकेटपटू अनुष्का शर्माला भारतीय महिला क्रिकेटमध्ये मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने इंग्लंड दौऱ्यासाठी भारत-अ महिला संघाची टी-२० कर्णधार म्हणून तिची निवड केली आहे. अनुष्का शर्माच्या नेतृत्वाखाली भारत-अ महिला संघ इंग्लंड-अ संघाविरुद्ध तीन टी-२० सामने खेळेल. हे सामने नॉर्थम्पटन आणि चेल्सफोर्ड येथे होतील. तिच्या आक्रमक खेळाचे आणि सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक करत निवडकर्त्यांनी तिच्यावर विश्वास दाखवला आहे. या जबाबदारीबद्दल अनुष्का शर्मा म्हणाली की, देशासाठी खेळणे हे प्रत्येक खेळाडूचे स्वप्न असते. कर्णधार म्हणून संघाचे नेतृत्व करणे ही तिच्यासाठी अभिमानाची



बाब आहे. ती आपल्या संघासाठी सर्वोत्तम कामगिरी करण्याचा पूर्ण प्रयत्न करेल.

अष्टपैलू खेळाडू अनुष्का शर्माने देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. नुकत्याच झालेल्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर तिने भारतीय वरिष्ठ संघासाठी पदार्पण केले, जिथे तिने तीन सामन्यांमध्ये उपयुक्त खेळी खेळल्या आणि आपली क्षमता




दाखवून दिली. महिला प्रीमियर लीग २०२६ मध्ये अनुष्का शर्माने गुजरात जायंट्ससाठी खेळताना ३० चेंडूंमध्ये ४४ धावांची वेगवान खेळी केली, ज्यामुळे तिच्या आक्रमक फलंदाजीची झलक दिसली. मध्यप्रदेश महिला लीगच्या दुसऱ्या हंगामात अनुष्का शर्माला बुंदेलखंड बुल्सने कायम ठेवून संघाचे कर्णधारपद सोपवले आहे. पहिल्या हंगामात ती उपकर्णधार होती आणि संघाला विजेतेपद मिळवून देण्यात तिने महत्त्वाची भूमिका बजावली होती. यावेळी लीगचे आयोजन इंदूरमध्ये केले जाईल.

### अनुष्काची आत्तापर्यंत दमदार कामगिरी

अनुष्का शर्माचा घरगुती क्रिकेटमधील प्रवासही खूप प्रभावी राहिला आहे. ती मध्य प्रदेश वरिष्ठ महिला संघाची उपकर्णधार राहिलेली आहे. अंडर-१९ चॅलेंजर ट्रॉफीमध्ये "इंडिया बी" संघाचे कर्णधारपद भूषवले आहे. मध्य प्रदेश अंडर-१९ संघाला राष्ट्रीय उपविजेते बनवले. अनुष्काला चंद्रा नायडू पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. सिनियर्स वनडे ट्रॉफी (२०२४-२५) मध्ये मध्य प्रदेशला चॅम्पियन बनवण्यात तिची महत्त्वाची भूमिका राहिली. तिने २०२५ मध्ये "प्लेअर ऑफ द टूर्नामिंट" सह अनेक पुरस्कारही जिंकले आहेत.

---


## फ्रेंच ओपनच्या बक्षीस रकमेवर अनेक स्टार खेळाडू नाराज

**मुंबई /वृत्तसंस्था**

ग्रँड स्लॅम आयोजकांसोबत सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, नोव्हाक जोकोविच, जॅनिक सिनर आणि आर्यना साबालेंका यांच्यासह पुरुष आणि महिला टेनिसमधील अव्वल खेळाडूंनी एक संयुक्त निवेदन प्रसिद्ध केले आहे. आगामी 'फ्रेंच ओपन'च्या बक्षीस रकमेबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. रोलां गॅरो येथे २४ मे पासून मुख्य स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

रोलां गॅरो आयोजकांनी एकूण बक्षीस निधीत केवळ १० टक्के वाढ केली असून ती आता ६१.७ दशलक्ष युरो (७२.१ दशलक्ष) झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यात ५.३ दशलक्ष युरोची वाढ झाली आहे. मात्र, स्पर्धेचे एकूण उत्पन्न पाहता ही वाढ खेळाडूंच्या अपेक्षेपेक्षा अत्यंत कमी असल्याचे खेळाडूंचे म्हणणे आहे. तसेच, अधिकृत प्रतिनिधीत्व, आरोग्य सुविधा आणि निवृत्ती वेतन यांसारख्या त्यांच्या इतर मागण्यांकडेही अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे खेळाडूंनी म्हटले आहे.

सोमवारी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, "रोलां गॅरो स्पर्धेच्या महसुलातील खेळाडूंचा वाटा २०२४ मधील



१५.५ टक्के वरून २०२६ मध्ये १४.९ टक्के पर्यंत खाली येण्याची शक्यता आहे." ही वाढ गेल्या वर्षीच्या 'यूएस ओपन'मध्ये झालेल्या २० टक्के वाढीच्या तुलनेत खूपच कमी आहे. खेळाडूंचा असा युक्तिवाद आहे की, एकूण महसुलाच्या टक्केवारीनुसार बक्षीस निधी प्रत्यक्षात कमी होत आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, "स्पर्धेच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, २०२५ मध्ये रोलां गॅरोचा महसूल ३९५ दशलक्ष युरो होता, जो आधीच्या वर्षापेक्षा १४ टक्के जास्त होता. मात्र, बक्षीस रकमेत केवळ ५.४ टक्के वाढ झाली, ज्यामुळे महसुलातील खेळाडूंचा वाटा १४.३ टक्के पर्यंत कमी झाला."

"यावर्षीचा महसूल ४०० दशलक्ष युरोपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज असूनही खेळाडूंचा वाटा १५ टक्के च्या खालीच राहण्याची शक्यता आहे. खेळाडूंनी हा वाटा २२ टक्के करण्याची मागणी केली आहे.

## IPL मध्ये हा रेकॉर्ड करणारा रोहित शर्मा तिसरा फलंदाज


**मुंबई :** आयपीएल २०२६ स्पर्धेतील ४७ वा सामना मुंबई इंडियन्स आणि लखनौ सुपर जायंट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. हा सामना दोन्ही संघांसाठी अतिशय महत्वाचा होता. कारण गुणतालिकेतील ९ व्या १० व्या स्थानी असलेल्या संघांमध्ये झालेल्या या सामन्यात जो संघ जिंकणार तो स्पर्धेत टिकून राहणार होता, तर पराभूत होणारा संघ स्पर्धेतून जवळजवळ बाहेर पडणार होता. त्यामुळे मुंबई इंडियन्सने धावांचा पाठलाग करताना पूर्ण जोर लावला. २२९ धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या मुंबई इंडियन्स संघाकडून रायन रिकल्टने ८३ धावांची खेळी केली. तर रोहित शर्माने सर्वाधिक ८४ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याने आयपीएल स्पर्धेतील सर्वात मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. हा मुंबई इंडियन्सचा या हंगामातील तिसराच विजय आहे. याआधी झालेल्या १० पैकी ७ सामन्यांमध्ये मुंबई इंडियन्सला पराभवाचा सामना करावा लागला आहे. १२ एप्रिलला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाविरूद्ध झालेल्या सामन्यादरम्यान रोहित शर्मा दुखापतग्रस्त झाला होता. तेव्हापासून तो संघाबाहेर होता. आता लखनौ सुपर जायंट्स संघाविरूद्ध झालेल्या सामन्यात त्याला पुनरागमन करण्याची संधी मिळाली. या संधीचा त्याने पुरेपूर फायदा घेतला.

## अर्चरी वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेला आजपासून सुरुवात

### ४४ देशांतील ३०० हून अधिक तिरंदाज

**शांघाय/वृत्तसंस्था**

ज्योती सुरेखा वेन्नम आणि दीपिका कुमारी यांसारख्या अनुभवी खेळाडूंच्या नेतृत्वाखाली १६ सदस्यीय भारतीय संघ मंगळवारपासून चीनच्या शांघायमध्ये होणाऱ्या अर्चरी वर्ल्ड कप २०२६ स्टेज २ मध्ये सहभागी होत आहे. ५ ते १० मे दरम्यान चालणाऱ्या या स्पर्धेत ४४ देशांतील ३०० हून अधिक तिरंदाज सहभागी होतील. साल्टिलो येथे होणाऱ्या वर्ल्ड कप फायनलसाठी पात्र ठरण्याची ही महत्त्वाची संधी आहे. मेक्सिकोमध्ये झालेल्या हंगामातील पहिल्या वर्ल्ड कपमध्ये भारताला केवळ एका पदकावर समाधान मानावे लागले होते. आता चीनमध्ये भारतीय संघ अधिक चांगली कामगिरी करण्याच्या उद्देशाने मैदानात उतरेल.




गेल्या महिन्यात मेक्सिकोतील स्टेज १ मध्ये भारताने केवळ एक सुवर्णपदक (महिला कंपाऊंड टीम - ज्योती, मधुरा आणि प्रगती) जिंकले होते. गेल्या वर्षी शांघायमध्ये भारताने ७ पदके जिंकली होती, त्यामुळे भारतीय संघाचा आत्मविश्वास उंचावलेला आहे. वैयक्तिक सुवर्णपदक विजेती मधुरा धामणगावकर, माजी जगज्जेता ओजस देवतळे आणि ३८ वर्ल्ड कप पदके नावावर असलेली दीपिका कुमारी यांच्याकडे सर्वांचे लक्ष असेल.

### भारतीय महिला-पुरुष तिरंदाज

**रिकर्व्ह पुरुष :** यशदीप भोगे, धीरज बोम्मादेवर, अतनू दास, तरुणदीप राय.
**रिकर्व्ह महिला :** अंकिता भकत, सिमरनजीत कौर, दीपिका कुमारी, कुमकुम अनिल मोहोड. **कंपाऊंड पुरुष :** कुशल दलाल, ओजस देवतळे, साहिल जाधव, अभिषेक वर्मा.
**कंपाऊंड महिला :** प्रगती, मधुरा धामणगावकर, अदिती स्वामी, ज्योती सुरेखा वेन्नम.

---

## भारताने राष्ट्रीय विक्रम मोडला पण यश मिळवता आले नाही

**गॅबोरोन (बोत्स्वाना)/वृत्तसंस्था**

'वर्ल्ड अ‍ॅथलेटिक्स रिलेज २०२६' मध्ये सहभागी झालेल्या पाच भारतीय रिले संघांपैकी एकालाही २०२७ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचा कोटा मिळवण्यात यश आले नाही. मात्र, रविवारी भारतीय मिश्र ४x१०० मीटर संघाने नवीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केल्यामुळे खेळाडूंना आनंद साजरा करण्याची संधी मिळाली.

शनिवारी पहिली संधी हुकल्यानंतर, रविवारी चीनमधील बीजिंग येथे होणाऱ्या २०२७ च्या जागतिक अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी थेट पात्र होण्यासाठी भारतीय संघांना




आपापल्या हीटमध्ये पहिल्या दोन क्रमांकात येणे आवश्यक होते. राहुल कुमार, नित्या गांधी, अनिमेश कुजूर आणि स्नेहा सत्यनारायण शानुवल्ली यांचा समावेश असलेल्या भारतीय मिश्र ४x१०० मीटर रिले संघाने ४१.३५ सेकंद अशी वेळ नोंदवत नवा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. आठ संघांच्या या हीटमध्ये भारतीय संघ सहाव्या क्रमांकावर राहिला. या चौकडीने आधीचा विक्रम जवळपास एका सेकंदाच्या फरकाने मोडला. शनिवारी झालेल्या पहिल्या फेरीच्या पात्रता शर्यतीत भारताला शर्यत पूर्ण करता आली नव्हती. याआधीचा ४२.३० सेकंदांचा विक्रम या वर्षाच्या सुरुवातीला चंदीगडमधील नॅशनल ओपन रिलेमध्ये लालू प्रसाद भोई, उन्नती बोलांडा, हरिता भद्रा आणि जयराम दोंदापती यांनी केला होता. मिश्र ४x४०० मीटर शर्यतीत भारताने तीर्थेश पी. शेट्टी, कुमारी सलोनी, निहाल विल्यम आणि रशदीप कौर या दुसऱ्या श्रेणीच्या संघाला उतरवले होते. या चौकडीने ३:१९.४० वेळेसह आपल्या हीटमध्ये पाचवे स्थान मिळवले. शनिवारी पहिल्या फेरीच्या पात्रता फेरीत धावलेले ऑलिंपियन अमोज जेकब आणि अनसा बाबू यांना रविवारी विश्रांती देण्यात आली होती. तथापि, अमोज जेकबने पुरुष ४x४०० मीटर हीटमध्ये धर्मवीर चौधरी, सहकारी ऑलिंपियन राजेश रमेश आणि विशाल तेन्नारसू कायलविझी यांच्यासह भाग घेतला. पण पायाच्या दुखण्यामुळे तो शर्यत पूर्ण करू शकला नाही आणि भारताच्या नावावर 'डीड नॉट फिनिश' अशी नोंद झाली.

# चॉकलेट बॉय ते राजकारणाचं मैदान; विजयच्या राजकीय यशामागे दडलंय सिनेमांचं मोठं गणित

सध्या दाक्षिणात्य चित्रपटातील कलाकार विजय थलपती मोठ्या चर्चेत आहे. विधानसभा निवडणुकीत विजयचा 'तमिळगा वेत्री कळघम' (TVK) पक्ष सर्वाधिक जागांवर आघाडीवर आहे. जवळजवळ दीड वर्षांपूर्वी हा पक्ष स्थापन झाला होता.

अभिनेत्याचा सिनेमातील प्रवास पाहिला तर त्याने अचानक राजकारणात एन्ट्री घेतली नाही, तर दीर्घकाळापासून तो राजकारणात येण्याबद्दल विचार करत होता, त्याची दिशा ठरवत होता असे पाहायला मिळते.

विजय थलपती हा दिग्दर्शक एस. ए. चंद्रशेखर यांचा मुलगा आहे. विजयने बालकलाकार म्हणून सिनेसृष्टीत पदार्पण केले. त्यानंतर तो एस. ए. चंद्रशेखर म्हणजेच वडिलांनी दिग्दर्शित केलेल्या नालैया थीरपू या सिनेमातून प्रमुख भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आला. हा सिनेमा १९९२ ला प्रदर्शित झाला होता.

सुरुवातीला त्याने कौटुंबिक आणि रोमँटिक सिनेमांत काम केले, त्यामुळे कारकिर्दीच्या सुरुवातीला अभिनेत्याची चॉकलेट बॉय अशी ओळख होती. ९० च्या दशकातील त्याच्या चित्रपटांतून कोणताही राजकीय संदेश दिला जात नव्हता. मात्र, तो सिनेसृष्टीतील लोकप्रिय चेहरा बनला, त्याचा मोठा चाहतावर्ग निर्माण झाला.

२००० च्या दशकाच्या सुरुवातीला विजयने ॲक्शन सिनेमांत काम करायला सुरुवात केली. २००२ ला थमीझान हा सिनेमा प्रदर्शित झाला. हा सिनेमा अब्दुल मजिथ यांनी दिग्दर्शित केला होता, यामध्ये विजयबरोबर प्रियांका चोप्रा प्रमुख भूमिकेत दिसली होती. या सिनेमातील विजयच्या भूमिकेने सर्वांची मने जिंकली होती. एक तरुण समाजहित जपणाऱ्या मुलाची भूमिका अभिनेत्याने साकारली होती. त्यानंतर अभिनेत्याने घिल्ली (Ghilli) तसेच पोक्किरी यांसारख्या चित्रपटांमधून त्याची ही प्रतिमा अधिक ठळक केली. हे चित्रपट मुख्यतः मनोरंजनासाठी बनवले गेले होते, मात्र त्यामध्ये समाजातील औपचारिक संस्थांवर फारसा विश्वास दिसत नव्हता. विजयची चित्रपटातील पात्रे पारंपरिक यंत्रणा जिथे अपयशी ठरतात, तिथे स्वतः न्याय देताना दिसली. प्रशासनातील गुंतागुंत आणि राजकीय अकार्यक्षमता यामुळे जो समाज थकलेला होता, त्या समाजात त्याची ही प्रतिमा अधिक खोलवर पोहोचली.

२०११ च्या आसपास, ऑल इंडिया अण्णा द्रविड मुनेत्र कळघम (AIADMK) ने विधानसभा निवडणुका जिंकल्यानंतर, विजयच्या चित्रपटांमध्ये एक स्पष्ट राजकीय वळण दिसू लागलं. ए. आर. मुरुगादॉस (A. R. Murugadoss) सारख्या दिग्दर्शकांनी थुप्पाकी (Thuppakki) आणि कथ्थी (Kaththi) सारखे चित्रपट बनवले, ज्यामध्ये स्थानिक प्रश्न मांडले गेले.

कथ्थीमध्ये शेतकऱ्यांच्या संकटाचा



आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून नैसर्गिक संसाधनांच्या शोषणाचा मुद्दा मांडला गेला. या चित्रपटात मार्क्सवाद हा तात्त्विक सिद्धांत म्हणून नाही, तर दैनंदिन जीवनातील साध्या उदाहरणातून समोर आला. विजय जेव्हा पोट भरल्यानंतर घेतलेली एक अतिरिक्त इडलीही दुसऱ्याचा हक्क आहे असे म्हणतो, तेव्हा संवाद केवळ किमतीपुरते मर्यादित न राहता 'हक्क' (entitlement) या संकल्पनेवर आधारित होते. अशा प्रकारे चित्रपटात वर्गसंघर्षाला नैतिक जाणिवेत रूपांतरित केलं, जे प्रेक्षकांपर्यंत थेट आणि सहज पोहोचलं.

२०१७ ला मर्सल (Mersal) हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. यामध्ये आरोग्य व्यवस्थेवर आणि तिच्या वाढत्या व्यापारीकरणावर तीव्र टीका करण्यात आली. त्यानंतर ए. आर. मुरुगादॉस यांनी दिग्दर्शित केलेल्या सरकार सिनेमात त्याने सुंदर नावाच्या टेक सीईओची भूमिका साकारली होती. तो भारतात परतल्यावर त्याचं नाव मतदार यादीत नसल्याचं पाहतो. यानंतर तो व्यवस्थेला आव्हान देतो आणि निवडणूक गैरप्रकारांविरुद्ध लढा देत, वंचित मतदारांच्या हक्कांसाठी उभा राहतो. हे चित्रपट केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नव्हते; त्यांनी गुंतागुंतीच्या धोरणात्मक मुद्द्यांना भावनिक पातळीवर मांडले. विजयने साकारलेली पात्रे केवळ चित्रपटातील हीरो म्हणून मर्यादित नव्हती, तर ती पात्रे बदल घडवण्याची तीव्र इच्छा असलेले सुधारक होते. त्याच्या व्यक्तिरेखा थेट प्रेक्षकांशी संवाद साधत, हक्क आणि कर्तव्य, प्रशासन आणि सत्तेला जबाबदार धरणे याबद्दल बोलत. विजयच्या चित्रपटांतील नायक सामान्य माणसाचा आवाज बनतात. सामाजिक न्याय, कल्याणकारी धोरणं आणि भ्रष्टाचारविरोधी विचार हे त्याच्या सिनेमातील प्रमुख विषय होते.

**चॉकलेट बॉय ते सुधारणाकेंद्रित नायक**

विजयचा राजकारणात येण्याचा निर्णय हा अचानक घेतलेला निर्णय नाही, तर अभिनयापासून ते राजकीय क्षेत्रात जाण्यापर्यंत चित्रपटांतून त्याच्या प्रवासाला एक दिशा मिळाल्याचे दिसते. सुरुवातीच्या काळातील रोमँटिक, चॉकलेट बॉय, सहानुभूतीपूर्ण असलेली त्याची चित्रपटातील प्रतिमा सरकार, कथ्थी या चित्रपटांतून सुधारणाकेंद्रित नायकापर्यंतचा एक काळजीपूर्वक घडवलेला त्याचा पडद्यावरील प्रवास पाहायला मिळतो.

विजयच्या चित्रपटांतून त्याने त्याची सामान्य माणसासाठी प्रशासन आणि न्याय या केंद्रस्थानी ठेवलेली एक राजकीय प्रतिमा तयार केली आहे. विजयचा राजकीय प्रवास फक्त पक्ष स्थापन करण्याने किंवा एखाद्या प्रभावी भाषणाने सुरू झालेला नाही; तो पडद्यावरच सुरू झाला होता, त्या कथांमधून त्याला हळूहळू नायकाचा नेता बनवलं. वर्षानुवर्षे राजकीय प्रतीकांनी भरलेल्या चित्रपटांमधून त्यानी आपली प्रतिमा घडवली आहे.

## 'मर्दिनी' सिनेमाच्या पोस्टरची पहिली झलक आली समोर




श्रेयस तळपदे प्रस्तुत, ॲफ्लुएन्स मोशन पिक्चर्स प्रा. लि. आणि ओ डी आय ग्रुप निर्मित 'मर्दिनी' हा नवा मराठी सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर लॉन्च करण्यात आले असून, या निमित्ताने चित्रपटाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. पोस्टरमधून समोर आलेली पहिली झलक आणि त्यावरील आशयपूर्ण कॅप्शनमुळे चित्रपटाविषयी प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढताना दिसत आहे. नारीशक्ती, संघर्ष, आत्मसन्मान आणि आईच्या सामर्थ्याची कथा मांडणारा हा चित्रपट ३ जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे.

चित्रपट केवळ स्त्रीशक्तीवर आधारित नसून, आईच्या भावविश्वाला केंद्रस्थानी ठेवणारी कथा असल्याचे समोर येत आहे. पोस्टरवरील "आई तारी तिला कोण मारी" म्हणजेच लेकरांसाठी आई ज्योतही पेटवते आणि राक्षसांसाठी चिताही. हे कॅप्शन चित्रपटाच्या आशयाची प्रभावी झलक देते. आई ही फक्त प्रेम, माया आणि जपणुकीची प्रतिमा नसते, तर आपल्या लेकरांवर संकट आले की ती कठोर आणि निर्भय रूप धारण करून त्यांचे रक्षण करण्यासाठी उभी राहते, ही भावना या कथानकातून प्रभावीपणे मांडली जाणार आहे. त्यामुळे हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता भावनिक आणि प्रेरणादायी अनुभव देणारा ठरणार आहे.

चित्रपटात प्रार्थना बेहेरे, अभिजीत खांडकेकर, जितेंद्र जोशी, राजेश भोसले यांसारखे दमदार कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. त्यांच्या अभिनयामुळे कथेला अधिक प्रभावीपणा मिळणार असून, बालकलाकार मायरा वैकुळ हिची भूमिका कथेत भावनिक पैलू जोडणारी ठरणार आहे. कलाकारांची निवड आणि विषयाची ताकद यामुळे 'मर्दिनी' बद्दलची उत्सुकता अधिक वाढत आहे.

## पाणी देण्यास जल पुरवठा मंडळाचा नकार; वाराणसी चित्रपट निर्मात्यांच्या अडचणीत वाढ

एसएस राजामौली यांच्या बहुप्रतिक्षित 'वाराणसी' चित्रपटाच्या शूटिंगमध्ये अडचणी येऊ शकतात. या चित्रपटाचे शूटिंग हैदराबाद फिल्मसिटीमध्ये सुरू आहे. चित्रपटातील काही दृश्यांसाठी निर्मात्यांना एक तलाव तयार करायचा होता, ज्यासाठी त्यांना हजारो लिटर पाणी लागणार होते, परंतु आता जलपुरवठा मंडळाने यास नकार दिला आहे.

'वाराणसी' चित्रपटाची निर्मिती कंपनी श्री दुर्गा आर्ट्सने अलीकडेच राजेंद्रनगरमधील गगनपहाड येथील फिल्मसिटीमध्ये तलाव तयार करण्यासाठी हैदराबाद महानगर जलपुरवठा आणि सांडपाणी मंडळाला पत्र लिहून १५० पाण्याच्या टँकरची मागणी केली होती. निर्मिती कंपनीने मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अशोक रेड्डी यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले होते की, पाण्यासाठी कंपनी त्यांना टँकरचे भाडेही देईल. तथापि, मंडळाने हे पत्र फेटाळून लावले आहे.

सेटवर आधीच तलाव बांधण्यात आला आहे, ज्यात प्रति टँकर १० हजार लिटर क्षमतेचे १५० टँकर वापरले जाणार होते. १८ मे रोजी होणाऱ्या शूटिंगसाठी पाणी शुद्ध केले जाणार होते. पण वाढत्या उष्णतेमुळे निर्माण



झालेल्या पाणीटंचाईमुळे जलपुरवठा मंडळाने प्रॉडक्शनच्या सर्व मागण्या फेटाळून लावल्या आहेत. मंडळाने पत्र फेटाळल्यानंतर निर्माते आता पाण्याची मागणी कशी पूर्ण करतील आणि शूटिंग सुरू ठेवतील हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. एसएस राजामौली यांच्या दिग्दर्शनाखाली बनत असलेला 'वाराणसी' हा चित्रपट ७ एप्रिल २०२७ रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटातून प्रियांका चोप्रा भारतीय सिनेमात पुनरागमन करत आहे. या चित्रपटात तिच्यासोबत महेश बाबू मुख्य भूमिकेत दिसणार आहे.

## 'राजा शिवाजी' ने विकेंडला केली रेकॉर्डब्रेक कमाई

राजा शिवाजी' सिनेमाने विकेंडला ३७ कोटी नेट कमाई केली आहे. यासह हा मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वात मोठा ओपनिंग वीकेंड करणारा सिनेमा ठरला आहे. जिओ स्टुडिओज आणि मुंबई फिल्म कंपनी प्रस्तुत रितेश विलासराव देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी', या भव्य ऐतिहासिक चित्रपटाने प्रदर्शनाच्या पहिल्याच विकेंडमध्ये अभूतपूर्व यश मिळवले. सिनेमाचे कथानक आणि तंत्रज्ञानाने प्रेक्षकांनी चांगलीच पसंती मिळवली. या सिनेमाने मराठी सिनेविश्वातील आतापर्यंतचे सगळे रेकॉर्ड मोडून काढले.

महाराष्ट्र दिनाला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने पहिल्याच दिवशी विक्रमी कमाई नोंदवली. त्यानंतर शनिवारी मजबूत पकड कायम ठेवत, रविवारी चित्रपटाने आणखी मोठी झेप घेत विकेंडमधील सर्वोच्च कमाई केली. रविवारी चित्रपटाने १३.१० कोटी नेट कमाई करत शनिवारीच्या तुलनेत १३.५ टक्के वाढ नोंदवली. यासह, तीन दिवसांची एकूण कमाई ३७ कोटी नेट झाली आहे.

चित्रपटाच्या प्रभावी मांडणी, भव्य निर्मितीमूल्ये आणि भावनिक कथनशैलीमुळे प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. थिएटरमधील अनुभव हा एक सणासारखा वाटत असून, महाराष्ट्रभर चित्रपटाला जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. हाउसफुल्ल शो आणि वाढती प्रेक्षकसंख्या हे या यशाचे प्रमुख निदर्शक ठरत आहेत. विशेष म्हणजे, चित्रपटाच्या हिंदी आवृत्तीलाही देशभरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. प्रेक्षकांचा वाढता पाठिंबा आणि सर्व स्तरांतून मिळणारे कौतुक लक्षात घेता, 'राजा शिवाजी' आगामी दिवसांतही बॉक्स ऑफिसवर आपली मजबूत पकड कायम ठेवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बंजारा बहुल समिती स्थापन; इच्छुकाकडून प्रस्ताव मागविले

**जनसंचलन/बुलढाणा**

वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या विविध विकास कामांसाठी बंजारा बहुल बुलढाणा जिल्ह्यासाठी बंजारा बहुल समिती स्थापन करण्यात येणार आहे. यासंदर्भात मा. कार्यासन अधिकारी, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी पत्र क्र. संकिर्ण-२०२६/ सं.क्र.२३/योजना-५ दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील इच्छुक व्यक्तींनी समितीसाठी आपले परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. इच्छुकांनी आपला बायोडाटा, ओळखपत्र, जात प्रमाणपत्र, पोलीस पडताळणी प्रमाणपत्र ( ) आदी आवश्यक कागदपत्रांसह संपूर्ण प्रस्ताव सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, बुलढाणा येथे १५ दिवसांच्या आत तात्काळ सादर करावेत. प्राप्त झालेल्या परिपूर्ण प्रस्तावांची शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी शिफारस करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.


## आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

**बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..**



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | गुंतवणुक रक्कम ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

### ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...

**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १०००० ३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

**दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली**

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# डाक विभागाचा वार्षिक सत्कार समारंभ उत्साहात संपन्न

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृह येथे डाक विभागाचा वार्षिक सत्कार समारंभ २०२५-२६ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. वित्तीय वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तसेच डाक विभागात मोलाचे योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुलडाणा डाक विभागाचे अधीक्षक श्री. गणेश आंभोरे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर विभागाचे डाक निदेशक डॉ. सुधीर जाखेरे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत कर्मचाऱ्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना मान्यवरांनी कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या समर्पित सेवाभावाची प्रशंसा केली. बुलडाणा डाक विभागाने वित्तीय वर्ष २०२५-२६ मधील निर्धारित उद्दिष्टे १०० टक्के पूर्ण करून यशस्वी कामगिरी कायम राखल्याचे नमूद करण्यात आले. समारंभादरम्यान कर्मचाऱ्यांनी मागील वर्षातील कार्यप्रवास आणि विविध उपक्रमांची माहिती दिली. अधीक्षक श्री. गणेश आंभोरे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या नवकल्पना आणि उद्दिष्टपूर्तीसाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा यावेळी घेण्यात आला. डॉ. सुधीर जाखेरे यांनी विभागाची भावी दिशा, आव्हाने आणि संधी याबाबत मार्गदर्शन करत बुलडाणा डाक विभागाच्या कार्याची प्रशंसा केली. भविष्यातही अशाच उत्कृष्ट कार्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रल्हाद कचरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सतीश निकम, सहाय्यक अधीक्षक, बुलडाणा उपविभाग यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डाक विभागातील कर्मचारी व ग्रामीण डाक सेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# खेलो इंडिया राज्य निपुणता केंद्रांतर्गत शुटिंग, सायकलिंग व ॲथलेटिक्स निवड चाचण्या आयोजित

**जनसंचलन/बुलढाणा**

आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याच्या उद्देशाने राज्य व केंद्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या खेलो इंडिया स्टेट एक्सलन्स सेंटर (राज्य निपुणता केंद्र) अंतर्गत शुटिंग, सायकलिंग व ॲथलेटिक्स या खेळांच्या निवड चाचण्या आयोजित करण्यात आल्या आहेत. दि. १४ डिसेंबर २०२० रोजी मंजूर करण्यात आलेल्या या केंद्रांतर्गत पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे ॲथलेटिक्स, शुटिंग आणि सायकलिंग या खेळांचे प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. निवड चाचण्या ॲथलेटिक्स व सायकलिंगसाठी दि. ११ व १२ मे २०२६ रोजी तर शुटिंगसाठी दि. १८ व १९ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता घेण्यात येणार आहेत. या निवड प्रक्रियेसाठी पात्र खेळाडूंकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. निवड प्रक्रियेनुसार ॲथलेटिक्समध्ये १६ खेळाडू (०७ मुले व ०९ मुली), सायकलिंगमध्ये ०१ मुलगी आणि शुटिंगमध्ये १० खेळाडू (०६ मुले व ०४ मुली) यांची निवड करण्यात येणार आहे. संबंधित खेळ प्रकारांमध्ये तज्ज्ञ समितीमार्फत खेळाडूंची चाचणी घेऊन गुणानुक्रमे प्रवेश निश्चित करण्यात येणार आहे.


पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार

सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल

वेब साईड & पोर्टल चॅनल

वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर

कुठली ही बातमी निशुल्क




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

काही तक्रार असल्यास संपर्क

शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040 पिन 443001

# भोन येथील ऐतिहासिक स्तूपावर बुद्ध महावंदना सोहळा संपन्न

जनसंचलन/ संग्रामपूर

बुलढाणा जिल्ह्याच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवात मोलाची भर घालणाऱ्या संग्रामपूर तालुक्यातील भोन येथे बुद्ध जयंतीचे औचित्य साधून भव्य बुद्ध महावंदनाफ कार्यक्रम उत्साहात पार पडला. जागतिक स्तरावर ओळख निर्माण झालेल्या या बुद्ध स्तूप स्थळावर भारतीय स्तूप व लेणी संवर्धन समितीच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या पाच मान्यवरांना जीवन गौरव पुरस्कार २०२६ देऊन गौरविण्यात आले. विविध क्षेत्रांतील रत्नांचा सन्मान दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समितीच्या वतीने समाजासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची निवड करण्यात आली होती. यामध्ये खालील मान्यवरांचा समावेश होता:
भीमराव वाघमारे: (माजी परीक्षा नियंत्रक, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ) शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल.
सुदाम सोनुले: सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीतील प्रदीर्घ योगदानाबद्दल.
अनिल बहादुरे: (माजी मुख्य अभियंता, जलसिंचन विभाग, अमरावती) प्रशासकीय सेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल.
डॉ. संतोष वाकोडे: संशोधन क्षेत्रात केलेल्या महत्त्वपूर्ण कार्याबद्दल.
विजयमाला वानखडे: (अध्यक्षा, भिमाई महिला बचत गट) उद्योग क्षेत्रात महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याबद्दल.
मान्यवरांचे मनोगत
पुरस्काराला उत्तर देताना अनिल बहादुरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, शासकीय सेवेत असताना जलसिंचन प्रकल्पांच्या माध्यमातून भोन सारख्या ऐतिहासिक स्थळासाठी सेवा करण्याची संधी मिळाली, हे माझे भाग्य आहे. समाजोपयोगी उपक्रमांसाठी मी सदैव कटिबद्ध राहीन. तसेच, भीमराव वाघमारे यांनी सामाजिक परिवर्तनावर भाष्य करताना सांगितले की, इतिहासातील घडामोडींचा अभ्यास करूनच आपण भविष्यातील आव्हानांना सामोरे जाऊ शकतो. युवकांनी शिक्षण आणि संशोधनाच्या संधी ओळखून प्रगती साधणे काळाची गरज आहे. सुदाम सोनुले यांनी देखील समितीने त्यांच्या कार्याची दखल घेतल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सांस्कृतिक आणि संघटनात्मक उपस्थिती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष डॉ. सिद्धार्थ मेश्राम होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव प्रा. प्रफुल खंडारे यांनी केले, तर सूत्रसंचालन कोषाध्यक्ष जी. एन. ब्राम्हणे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने पार पाडले. तर आभार प्रदर्शनाची जबाबदारी राजाभाऊ कोकाटे यांनी पार पाडली. संपूर्ण सोहळ्याच्या नियोजनात उपाध्यक्ष तथा मुख्य समन्वयक राजदत्त अलोने यांची भूमिका महत्त्वाची ठरली.

# शिवसाई यूनिवर्सल जुनिअर कॉलेज कोलवड , बुलडाणा ची १२वी च्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम!

जनसंचलन बुलढाणा

शिवसाई यूनिवर्सल जुनिअर कॉलेज कोलवड , बुलडाणा ची १२वी च्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम विज्ञान शाखा निकाल - १०० % फेब्रुवारी/ मार्च २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने घेतलेल्या परीक्षा मध्ये शिवसाई यूनिवर्सल ज्युनिअर कॉलेज कोलवड, बुलडाणा येथील ५५ विद्यार्थी प्रवेशित झाले होते. यापैकी एकूण ८५ टक्क्याच्या वर गुण मिळविणारे एकूण २४ विद्यार्थी असून, २६ विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत (७५-८४%), ५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. याप्रमाणे महाविद्यालयाने आपली उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयातून कु. ऋतुजा विनोद राऊत हिने ९२% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर कु. वंशिका गजेश जयस्वाल हिने ९१.१७% गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक तर तृतीय क्रमांक मृणाल संतोष शिनकर हीने ८९.६७% गुण प्राप्त करून पटकवला आहे. कु.ऋतुजा पोफळे ८९.५०%, श्रेयस डुकरे ८९.५०%, अलोक देशमुख ८९.५०%, धनंजय शिंदे



८९.००%, भावना शर्मा ८९.००%, कु. स्नेहा मोरे ८८.८३%, हर्षल जाधव ८८.१७%, सुहानी दांडगे ८८.१७%, दक्ष चव्हाण ८८.००%, दिशा काळवाघे ८७.१७%, सर्वेश कोलते ८७.००%,दीपाली राऊत ८७.००%, गायत्री मोरे ८६.५०%, रितेश घोती ८६.५०%, शंतनू वाघ ८६.३३%, श्रावण चव्हाण ८६.००%,सुमित बोचरे ८५.८३%,स्नेहल मिसाळ ८५.८३% संचिता कोळेकर ८५.१७%,आदित्य जाधव ८५.००%,सोमनाथ जाधव ८५.००%गुण प्राप्त करून विशेष प्रावीण्य मिळवले आहे. शिवसाई यूनिवर्सल ने , व परीक्षेत देखील आतापर्यंत आपला निकालाचा दबदबा कायम ठेवला आहे. आतापर्यंत एकूण १४ विद्यार्थी ,४१ विद्यार्थी व साठी प्रवेशित झाले आहेत. तर च्या माध्यमातून १ विद्यार्थी , ५ विद्यार्थी व ५ विद्यार्थी साठी प्रवेशित झाले आहेत. तर - परीक्षेच्या माध्यमातून ७०० च्या वर विद्यार्थी इंजिनियरिंग, अग्रिकल्चर , नर्सिंग , फार्मसी क्षेत्रात प्रवेशित झालेले आहेत. विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. सुनील दाभाडकर, प्रा.प्रमोद मोहरकर, प्रा. सविता वानखेडे, प्रा.स्वप्नील काकडे, प्रा. मनोहर उजेड, प्रा. दीपक रंजाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शक करणाऱ्या सर्व विषय शिक्षक तथा प्राध्यापकांचे संस्था अध्यक्ष श्री. डी एस लहाने सर यांनी अभिनंदन केले.

## CHANGE OF NAME

My Old Name Before Marriage Was "NANDADEVI DEVILAL JAISWAL" and after Marriage my new name is "NANDANI NITINKUMAR JAISWAL" And This Name i.e. "NANDANI NITINKUMAR JAISWAL" Should Be Considered For All Official And Legal Purpose.

Address:
"NANDANI NITINKUMAR JAISWAL"
Aurangabad Road,Gajanan Nagar, Ward No 6, Dhad, Buldhana, Maharashtra 443106

पाहिजेत
We are Hiring
खंडेलवाल ज्वेलर्स (अकोला) प्रा.लि.
बुलढाणामध्ये
ज्वेलरी शोरुमसाठी तरुण, उत्साही उमेदवार पाहीजेत.
1) शॉप मॅनेजर- 1 (M/F)
कॉम्प्युटर अनुभवी आवश्यक व ज्वेलरी कामाची माहीती असलेल्या अनुभवी व्यक्तींना प्राधान्य
2) सेल्स एग्जीक्यूटिव - 5 (M/F)
बारावी शिक्षण आवश्यक, स्मार्ट व हसतमुख, कॉम्प्युटर अनुभवी आवश्यक.
3) कॅशियर - 2 (M)
पदवीधर आणि तत्पर, जबाबदारीने कॅश काऊंटर हाताळण्याचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य
आजच संपर्क करा..!
सर्व पदांसाठी सरकारी नियम (PF/ESIC) अनुसारआकर्षक पगार, इन्सेंटीव्हज व ईतर अलाउंस
आपली संपूर्ण माहिती व फोटोसह आपले अर्ज ई-मेल करा
hrkjapl@gmail.com
अधिक माहितीसाठी संपर्क: 9545454762 / 9545450822